ठाणे वार्ता
बातमी तीच, जी सत्य असेल!

# दादासाहेब साहेब फाळके चित्रनगरीच्या दालनाचे उद्घाटन



**नाशिक:**

नाशिक येथे विश्व मराठी संमेलन सुरु आहे. या विश्व मराठी संमेलनात विविध प्रकाशकांसह काही शासकीय कार्यालयांचे दालने देखील उभारण्यात आले आहे. यामध्ये मुंबई गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्म सिटी)चे दालन देखील उभारण्यात आले आहे. या दालनाचे उद्घाटन मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनास भेट देण्याचे आवाहन केले आहे.

दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्म सिटी) च्या दालनाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे आणि साहित्यातील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. किरण कुलकर्णी यांनी विश्व मराठी संमेलनाला भेट द्यायला येणाऱ्या साहित्यप्रेमी नागरिकांना दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनास नक्की भेट द्या असे आवाहन केले. ते म्हणाले की, अतिशय सुंदर आणि आकर्षक असे दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी) चे दालन बनवले आहे. विशेष म्हणजे इथे तरुण मुला - मुलींना कन्टेंट क्रिएशनची संधी दिली जाणार आहे. याठिकाणी त्यांनी आपला कन्टेंट क्रिएट करावा तो कंन्टेंट कॅमेऱ्यासमोर सादर करावा आणि आपली फिल्म स्वतः तयार करावी. फिल्म तयार करण्याची वेगवेगळी अंग काय आहेत याची माहिती सर्वांना कळेल असा यामगाचा हेतू आहे. त्यामुळे सर्व नाशिककरांना आणि विश्व मराठी संमेलनाला जे जे साहित्यप्रेमी यांनी फिल्मसिटीच्या या दालनाला निश्चित भेट द्यावी आणि या दालनाचा आनंद घ्यावा या स्टॉलच्या माध्यमातून जी माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न फिल्म सिटी करते आहे त्याला प्रतिसाद द्यावा असे आवाहन मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांनी केले आहे.

March 1, 2026 | Page no: 1 | Thane
Powerd by - Amol Surve | 9869329948

मुंबई तरुण भारत
Main Paper | 2026-03-02 | Page- 6
epaper.mahamtb.com

# विश्व मराठी संमेलनात दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनाचे उद्घाटन

## डॉ. किरण कुलकर्णी यांच्याकडून दालनास भेट देण्याचे आवाहन

**मुंबई, दि. १ : प्रतिनिधी**

नाशिक येथे विश्व मराठी संमेलन सुरू आहे. या विश्व मराठी संमेलनात विविध प्रकाशकांसह काही शासकीय कार्यालयांची दालनेदेखील उभारण्यात आली आहेत. यामध्ये मुंबई-गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्म सिटी)चे दालनदेखील उभारण्यात आले आहे. या दालनाचे उद्घाटन मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, डॉ. किरण कुलकर्णी यांनी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनास भेट देण्याचे



आवाहन केले आहे.

उद्घाटनप्रसंगी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'चे अध्यक्ष सदानंद मोरे यांच्यासह साहित्यातील दिग्गज मान्यवर उपस्थित होते. यावेळी, डॉ. किरण कुलकर्णी यांनी विश्व मराठी संमेलनाला भेट द्यायला येणाऱ्या साहित्यप्रेमींना ''दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनास नक्की भेट द्या,'' असे आवाहन केले. ते म्हणाले की, ''अतिशय सुंदर आणि आकर्षक असे दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी)चे दालन बनवले आहे. विशेष म्हणजे, तरुण मुला-मुलींना 'कण्टेंट क्रिएशन'ची संधी दिली जाणार आहे. या ठिकाणी त्यांनी आपला 'कण्टेंट' 'क्रिएट' करावा; तो 'कण्टेंट' कॅमेऱ्यासमोर सादर करावा आणि आपली फिल्म स्वतः तयार करावी. फिल्म तयार करण्याची वेगवेगळी अंगे काय आहेत, याची माहिती सर्वांना कळेल, असा हेतू आहे. त्यामुळे सर्व नाशिककर आणि विश्व मराठी संमेलनाला येणाऱ्या साहित्यप्रेमींनी फिल्म सिटीच्या दालनाला निश्चित भेट द्यावी. स्टॉलच्या माध्यमातून जी माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न फिल्म सिटी करत आहे, त्याला प्रतिसाद द्यावा,'' असे आवाहन डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले आहे.

सकाळ

# चित्रनगरीच्या दालनाचा डंका

## विश्व मराठी संमेलनात सजावट स्पर्धेत प्रथम पुरस्कार

मुंबई/नाशिक, ता. १ : विश्व मराठी संमेलनाच्या व्यासपीठावर यंदा महाराष्ट्राच्या चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक चळवळीचा सशक्त ठसा उमटला. महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे उभारण्यात आलेल्या दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या दालनाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, दालन सजावट स्पर्धेत या दालनाने प्रथम पुरस्कार पटकावला. हा सन्मान ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी स्वीकारला. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी उपस्थित होते.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली दालनाची रचना करण्यात आली होती. दालनामध्ये महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. एक खिडकी योजना, दर्जेदार मराठी चित्रपटांना अर्थसहाय्य, राज्य मराठी चित्रपट पुरस्कार, चित्रपताका आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, चरित्रपट योजना यांसह अनेक कार्यक्रमांची ओळख करून देण्यात आली.



नाशिक : दालन सजावट पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी स्वीकारला.

### दालनात प्रशिक्षणवर्गांची माहिती

महामंडळ आणि फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्यातील करारातून सुरू असलेल्या प्रशिक्षणवर्गांची माहितीही दालनात देण्यात आली, ज्यामुळे चित्रपट शिक्षण व कौशल्यविकासाबाबत रसिकांना एक व्यापक दृष्टिकोन मिळाला. एकूणच, विश्व मराठी संमेलनातील दादासाहेब फाळके चित्रनगरीचे दालन केवळ सजावटीपुरते मर्यादित न राहता, महाराष्ट्राच्या चित्रपट संस्कृतीची दिशा, संधी आणि भविष्यातील शक्यता प्रभावीपणे मांडणारे ठरले. या यशामुळे राज्यातील सांस्कृतिक उपक्रमांना नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.